**प्रेसनोट** दिनांक –१३/०९/२०२३

**आरोपीत लोकसेवक श्री.नितीन आनंदराव गजपुरे, उप संचालक, औदयोगीक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, पालघर यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर यांनी घेतले ताब्यात**

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघर |
| २ | गुन्हा नोंद क्रमांक | पालघर पोलीस ठाणे, जिल्हा पालघर |
| ३ | कलम | भ्र.प्र.अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) चे कलम ७ प्रमाणे |
| ४ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | **आरोपीत लोकसेवक श्री.नितीन आनंदराव गजपुरे, उप संचालक, औदयोगीक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, पालघर** |
| ५ | मागितलेल्या लाचेची रक्कम | ३१,५००/–रूपये. |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | --- |
| ७ | थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार हे प्रमाणक शल्य चिकित्सक म्हणून पालघर जिल्हयांत कार्यरत आहेत. त्यासाठी आवश्यक असलेले महाराष्ट्र शासनाकडील प्रमाणपत्र तक्रारदार यांच्याकडे आहे. त्या अनुषंगाने तक्रारदार हे पालघर जिल्हयांत वेगवेगळया कंपनी/कारखान्यात जावून कामगारांची वैद्यकीय तपासणी करून त्याबाबतचे प्रमाणपत्र संबधित कारखानदारांना देत असतात.<br>यातील आरोपी लोकसेवक हे उपसंचालक म्हणुन औदयोगीक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, पालघर या कार्यालयात कर्तव्यावर असून त्यांनी तक्रारदार यांचा वरील व्यवसाय सुरळीतपणे चालू ठेवण्यासाठी तक्रारदार यांनी नोंव्हेबर २०२२ ते जुन २०२३ या कालावधीत वैद्यकीय तपासणी केलेल्या एकुण कामगारापैकी काही कामगारांच्या वैद्यकीय तपासणीबद्यल तक्रारदार यांच्याकडून प्रती कामगार ५०/–रूपये दराने पैसे स्विकारल्याचे कबुल करून उर्वरित ६३० कामगारांच्या केलेल्या वैद्यकीय तपासणीबद्यल ५०/–रूपये प्रती कामगार या दराने एकुण ३१,५००/– रूपये लाचेची मागणी केली. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर प. ४०१ ४०४.
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– dypacbpalghar@gmail.com
ऑनलाईन तक्रार :– ––
ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री नं. :– 1064
दुरध्वनी क्रमांक :– 02525-297297
व्हॉट्स ॲप क्र. :– 9423884745, 9404218543

१३/९

(दयानंद गावडे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पालघर